**<u>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा</u>**

**<u>आदेश क्रमांक ८७ सन २०२१, दिनांक-३१/०५/२०२१</u>**

पहा:- १) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची अधिसुचना क्रमांक ए-३९०२ /२०२१ दिनांक २५ मे, २०२१,

२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश दिनांक २७ मे, २०२१

संदर्भ क्रमांक ०१ वरील मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे अधिसुचनेनुसार या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, शेगांव यांचे न्यायालय नव्याने सुरु करण्यात आले आहे त्या अनुषंगाने स्थलांतर व नियुक्ती आदेश खालील प्रमाणे पारीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | नवीन नियुक्ती व स्थळ |
|---|---|---|
| ०१ | श्री. पी.एम.मौर्य, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर शेगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नवनिर्मीत पदी. |
| *०२ | कु. यु.पी.पटोकार, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, खामगांव यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर शेगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नवनिर्मीत पदी. |
| *०३ | श्रीमती एन.ए.आटे, कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधीश व.स्तर, खामगांव यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे आस्थापनेवर श्री. पी.एम.मौर्य, यांचे पदी कनिष्ठ लिपीक म्हणून. |
| ०४ | श्री. के.व्ही.अघाव, शिपाई, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांची आस्थापना. | दिवाणी न्यायाधीश क.स्तर शेगांव यांचे आस्थापनेवर २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे न्यायालयात कनिष्ठ लिपीक म्हणुन नवनिर्मीत पदी. |

उपरोक्त स्थलांतरीत कर्मचा-यांनी आपले पदाचा कार्यभार दिनांक ०४-०६-२०२१ चे मध्यान्हानंतर दयावा व आपले नुतन पदी पदग्रहण अवधी न घेता दिनांक ०७-०६-२०२१ चे मध्यान्हापूर्वला रुजू व्हावे.

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, खामगांव यांचे आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक कु. यु.पी.पटोकार व श्रीमती एन.ए.आटे व दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे आस्थापनेवरील शिपाई श्री. के.व्ही.अघाव, यांची पदे पुढील आदेशापावेतो रिक्त ठेवण्यात येत आहे. तसेच रिक्त ठेवलेल्या पदांचे काम समकक्ष कर्मचा-यांकडुन करुन घ्यावे.

तसेच २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव यांचे न्यायालयामधील शिपाई एक पद पुढील आदेशापावेतो रिक्त ठेवण्यात येत आहे.

(*) स्वेच्छेने स्थलांतर करण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या कामामध्ये हलगर्जीपणा तथा निष्काळजीपणा आढळून आल्यास व कर्मचाऱ्यांची प्रशासनास आवश्यकता भासल्यास, त्यांचे स्थलांतर इतरत्र कोठेही व केव्हाही होवू शकते, त्यांना "*मी आत्ताच बदलुन आलेलो आहे, माझी बदली पुढील पाच*

*वर्षापर्यंत होवु नये"* असे म्हणण्याचा अधिकार राहणार नाही तसेच त्यांचे स्थलांतर विनंती अर्जानुसार करण्यात आल्यामुळे त्यांना प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

सर्व स्थलांतरीत कर्मचाऱ्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी आपले पदाचा सविस्तर कार्यभार पिठासीन अधिकारी यांचे मार्फत जिल्हा न्यायालयास आदेश दिनांकापासुन एक महिन्याचे आत सादर करावा.

31.5.2021

(महेन्द्र के. महाजन)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक /आस्था/ १६२४ /२०२१, दिनांक :-३१ / ०५/२०२१
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

१) दिवाणी न्यायाधीश व.स्तर, खामगांव.
२) दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शेगांव.
३) अधिक्षक कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
४) वरिष्ठ लिपीक वेतन देयक / प्रवास भत्ता / कार्यव्यवस्थापन विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
५) सहाय्यक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा, यांना निर्देशीत करण्यात येते की त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.
६) अध्यक्ष / सचिव, बुलडाणा जिल्हा न्यायालयीन कर्मचारी सहपतसंस्था मर्यादित, खामगांव जि.बुलडाणा.
७) फाईल.